**Saraswati Mandir Night College**
**of Commerce and Arts**
1759, Shukrawar Peth, Pune-2

शुक्रवार दिनांक २८ जुन २०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त

शुक्रवार दिनांक २८ जुन २०१८ रोजी सायं. ५.०० वा पी.व्ही. हॉल मध्ये आयोजित करण्यात आलेल्या महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सुधार समितीच्या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे
श्री. अ. प्र. कुलकर्णी
श्री आनंद सराफ
डॉ. गीता राशिनकर
श्री राजेश अगावणे
श्री श्याम कांबळे
श्रीमती स्नेहल शेंडे
श्री विनय बोडस

या सभेमध्ये खालील प्रमाणे कामकाज झाले

१) सभेची विषयपत्रिका वाचणे
समितीचे समन्वयक विनय बोडस यांनी सभेची विषय पत्रिका वाचून दाखवि[ली] व मा. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेस सुरवात झाली.

२) समिती सदस्यांचा परिचय व स्वागत
समितीचे समन्वयक विनय बोडस यांनी सप्टेंबर २०१७ मध्ये नॅक समिती[च्या] भेटीनंतर नॅक व युजीसीच्या नविन नियमावलीनुसार अस्तित्वात आलेल्या समिती सदस्यांची नावे सांगितली. समिती सदस्य खालील प्रमाणे

i) Chairperson - Head of the Institution - Prin. Dr. P. N. Shende
ii) A Few Senior Admin. Officer - Smt. Snehal Shende.
iii) Three to Eight Teachers - Dr. Geeta Rashinkar
Shri. Rajesh Agawane
Smt. Ayodhya Jadhav
Shri. Shyam Kamble
iv) One member from management - Shri V. V. Ambekar Sir
v) One/two nominees from Local Society, Students & Alumni - Shri Anand Saraf sir
vi) One/two nominees from Employer Industrialist / Stakeholders - Shri Anil Jakotia Sir. - Shri Dr. A. P. Kulkarni Sir
vii) One of the senior teachers as the coordinator of the IQAC - Shri Vinay Bodas.

समितीचे समन्वयक विनय बोडस यांनी समितीतील सर्व सदस्यांचा परि[चय]

सभेस करून दिला व सर्वांचे संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने केले.

3) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गु[ण]वाढीसाठीची धोरणे निश्चित करणे.

हा विषय चर्चेला आल्यानंतर विद्यार्थी हा महाविद्यालयातील स[र्वात] महत्वाचा घटक असल्यामुळे त्याच्या गुणवत्तावाढीसाठीच्या योजनांव[र] खालील प्रमाणे चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

i) विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी सुविधा पुरविणे.

महाविद्यालयातील वाणिज्य आणि कला अशा ११ वर्गातील प्रत्ये[की] ५ विद्यार्थ्यांना ही सुविधा उपलब्ध करून द्यावयाची झाली तर त्यास[ाठी] येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,१०,०००/- (रुपये एक लाख दहा हजार फक्त) ची माहिती ग्रंथपाल श्री राजेश अगावणे यांनी सभेस दिली, या[साठी] प्रत्येक वर्गातील गरजू, अभ्यासू व होतकरू विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवि[ण्यात] आले.

पुस्तकपेढी या योजने अंतर्गत अशी सुविधा या शैक्षणिक वर्षापासून उपलब्ध करून देण्यासाठी अंदाजे रुपये १,१०,०००/- खर्च येणार असल्या[मुळे] सभेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शेंडकर यांनी महाविद्यालयाच्या महाविद्या[लय] विकास समितीमध्ये हा विषय घेणे आवश्यक असल्याचे सभेच्या निदर्शनास आणून दिले. महाविद्यालय विकास समितीच्या मंजुरीनंतर योजना सुरु करण्याची मान्यता सभेने दिली.

ii) विद्यार्थ्यांना दर आठवड्याला दोन विषयांची पुस्तके उपलब्ध करून देण्या बाबत.

हा विषय चर्चेला आल्यानंतर मा. ग्रंथपाल श्री राजेश अगावणे यां[नी] ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची संख्या, विद्यार्थी संख्या व सुविधेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या याची माहिती सभेस दिल[ी] त्यावर चर्चा होऊन या शैक्षणिक वर्षासाठी मागील वर्षाप्रमाणेच एक पुस्त[क] देण्याची सुविधा सुरु ठेवण्यास सभेने मान्यता दिली.

iii) विद्यार्थ्यांना प्रश्नपेढी पुरविणे.

हा विषय चर्चेला आल्यानंतर महाविद्यालयातील सर्व अध्यापकांनी शिकवित असलेल्या विषयांच्या प्रश्न पेढ्या तयार करून ग्रंथालयास उपलब्ध करून देण्यासंदर्भात चर्चा झाली व सभेने त्यास एकमताने मान्यता दिली. ग्रंथालयाकडून या प्रश्न पेढ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार मेल करण्यास सभेने मान्यता दिली.

iv) रोजगार मार्गदर्शन केंद्र सुरु करणे बाबत.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पर्यंत महाविद्यालयात अस्तित्वात असलेल्या

व्यवसाय मार्गदर्शन समितीद्वारे विद्यार्थ्यांना नोकरी/व्यवसाय विषयक मार्गदर्शन दिले जात होते. या शैक्षणिक वर्षापासून म्हणजे २०१८-१९ पासून इच्छुक विद्यार्थ्यांकडून त्यांचे Bio-Data भरून घेऊन त्यांची अद्ययावत माहिती महाविद्यालयात ठेऊन बाहेरील संस्थांकडून नोकरी विषयक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यास सभेने मान्यता दिली. डॉ. सविता थोरात यांची ह्या कार्याची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यास सभेने मान्यता दिली.

v) स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करणे -

महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करून त्या केंद्रा मार्फत विद्यार्थ्यांना G.D.C.&A या परीक्षेसंदर्भात माहिती व मार्गदर्शन करण्यास सभेने मान्यता दिली. श्री राजेश अगावणे यांची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यास सभेने मान्यता दिली.

vi) Tally course

सरस्वती मंदिर संस्थेमार्फत महाराष्ट्र स्टेट स्किल डेव्हलपमेंट सोसायटीच्या प्रमोद महाजन कौशल्य विकास योजने अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या Tally course ची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देऊन महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन Tally शिक्षित होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यास सभेने मान्यता दिली. यासाठी आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांची सभा घेण्यासंदर्भात सभेने सूचना केली.

vii) इंग्रजी संभाषण वर्ग.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी संभाषण वर्ग सुरु करण्याची कल्पना सभेत मांडण्यात आली. सभेने त्यास एकमताने मंजूरी दिली. विद्यार्थ्यांना परवडेल अशा कमीत कमी शुल्कामध्ये असे वर्ग सुरु करण्यास सभेने मंजूरी दिली. श्रीमती जयाबादी यांच्या ह्या उपक्रमाची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यास सभेने मंजूरी दिली.

४) महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयातील शिक्षकांच्या गुणवत्तावाढीसाठी धोरण निश्चित करणे

हा विषय चर्चेला आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच महाविद्यालयातील शिक्षकांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्यासाठी सभेने खालील उपाययोजना सुचविल्या व मान्य केल्या.

i) पुस्तक परिचय -

प्रत्येक शिक्षकाने आपल्या विषयातील किंवा आपल्या आवडीच्या किमान एका पुस्तकाचा परिचय (Book Review) सादर करणे.

ii) आपला विषय शिकविताना असताना प्रचलित खडू-फळ्याच्या वापराबरोबरच आपल्या विषयाची विद्यार्थ्यांना अधिक माहिती प्राप्त व्हावी यासाठी प्रत्येक शिक्षकाने अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक

शिक्षकांनी आपला विषय शिकविताना PPT (Power Point Presentation) चा वापर करावा व त्यासाठी A. V. Hall चा उपयोग करावा.

iii) तज्ज्ञ व्यक्तिंच्या मार्गदर्शनासाठी महाविद्यालयातील शिक्षकांसाठी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करावे.

iv) महाविद्यालयातील शिक्षकांनी minor / major Research Project करण्यासाठी Proposals सादर करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे.

v) महाविद्यालयातील प्रत्येक शिक्षकाने केवळ शिकविण्याची भूमिका न बजावता आपल्या विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी त्यांचे पालकत्व स्वीकारणे गरजेचे वाटते. त्यामुळे प्रत्येक वर्गासाठी एक किंवा दोन शिक्षकांची 'पालक शिक्षक' म्हणून नियुक्ती करण्यास सभेने मंजूरी दिली. याबाबतचे अधिकार मा. प्राचार्यांना देण्यास सभेने मंजुरी दिली.

५) महाविद्यालयाचा सन २०१७-१८ चा AQAR तयार करुन NAAC बंगलुर यांना सादर करणे.
हा विषय चर्चेला आल्यानंतर NAAC समन्वयकांनी सन २०१७-१८ चा AQAR तयार करण्यासाठी आवश्यक ती Criterianwise माहिती जमा करण्यासाठी सुरु असलेल्या कार्याची माहिती सभेस दिली व जुलै अखेरपर्यंत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा AQAR तयार होऊन NAAC बंगलुर यांना पाठविण्याबद्दल आशा व्यक्त केली.

६) महाविद्यालयासाठी BULK SMS सुविधा प्राप्त करणे
महाविद्यालयाच्या कार्यालयीन कामकाजामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वाढविण्यासाठी महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थ्यांने प्रवेश घेतेवेळी त्याचा भ्रमणध्वनी क्रमांक तसेच E-mail कार्यालयात सादर करणे बंधनकारक केले. त्याचा उपयोग करुन वेळोवेळी सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील उपक्रमांबद्दल, परीक्षेबद्दल माहिती देण्यासाठी, सूचना देण्यासाठी BULK SMS ही सुविधा आवश्यक असल्याचे सभेच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे अशी सुविधा प्राप्त करण्यास सभेने मंजुरी दिली.

७) महाविद्यालयातील प्रकाशनांसाठी ISBN प्राप्त करणे
महाविद्यालयामार्फत वेळोवेळी प्रकाशित होणाऱ्या अंकांना मान्यता मिळविण्यासाठी आवश्यक ISBN प्राप्त करण्यासंदर्भात मा. ग्रंथपाल राजेश अगावणे यांनी सभेला माहिती दिली. याची आवश्यकता लक्षात घेऊन महाविद्यालयासाठी ISBN प्राप्त करण्यासाठी सभेने एकमताने मान्यता दिली व यासाठी आवश्यक ती कागदपत्र सादर करण्यासाठी मा. ग्रंथपाल यांना परवानगी दिली.

८) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्या वेळचे विषय

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी कोणताही विषय चर्चेसाठी सभेपुढे उपस्थित करण्यात आला नाही.

त्यानंतर सभेचे समन्वयक विनय बोडस यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सदस्यांनी महाविद्यालयाच्या गुणवत्तावाढीसाठी सुचविलेल्या उपाय योजनांबाबत सर्व सदस्यांना धन्यवाद दिले. त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे सरांच्या अनुमतीने सभा संपल्याचे घोषित केले.

(Vinay Shripad Bodas)

(डॉ. पी. एन. शेंडे)
(अध्यक्ष)

Saraswati Mandir Night College of Commerce and Arts, Bajirao Road, Pune-2.

Principal
Saraswati Mandir Night College of Commerce and Arts, Pune-2

(6)

Saraswati Mandir Night College
of Commerce and Arts
1359, Shukrawar Peth, Pune-2

मंगळवार दिनांक १९मार्च २०१९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त

मंगळवार दिनांक १९मार्च २०१९ रोजी सायं. ६.०० वाजता पु.वी. हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सुधार समितीच्या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे
श्री. वि. वि. आंबेकर
डॉ. ए. पी. कुलकर्णी
डॉ. गीता शारीनकर
श्री राजेश अगावणे
श्रीमती आयोध्या जाधव
श्री श्याम कांबळे
श्री विनय बोडस.

या सभेमध्ये खालील प्रमाणे कामकाज झाले.

१) सभेची विषयपत्रिका वाचणे -
समितीचे चेअरमन विनय बोडस यांनी सभेची विषयपत्रिका वाचून दाखवली आणि मा. अध्यक्ष प्राचार्य पी. एन. शेंडे यांच्या अनुमतीने सभेस सुरवात झाली.

२) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
हा विषय चर्चेला आल्यानंतर विनय बोडस यांनी शुक्रवार दिनांक २९ जून २०१८ रोजी सायं. ५.०० वाजता महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सुधार समितीच्या आयोजित करण्यात आलेल्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्यास सर्व सदस्यांनी एकमताने मंजूरी दिली. त्यावर सभेचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे यांनी स्वाक्षरी करून त्यास मंजूरी दिली.

३) मागील सभेमध्ये निश्चित केलेल्या उपक्रमांचा आढावा घेणे.
शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने समितीच्या २९ जून २०१८ रोजी झालेल्या सभेमध्ये अनेक योजना सुचविण्यात आल्या होत्या. त्या योजनांपैकी ज्या योजनांची कार्यवाही शैक्षणिक वर्ष २०१८-१९मध्ये करण्यात आली त्याबद्दलची माहिती सभेस देण्यात आली ती खालील प्रमाणे.

अ) विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी सुविधा पुरविणे.
महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन सुरु करण्यात आलेल्या या योजनेबद्दलची माहिती महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री राजेश अगावणे यांनी सभेस दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार ही योजना

महाविद्यालयात कार्यान्वित करण्यासाठी महाविद्यालयाला श्री सिद्धी विनायक ट्रस्ट मुंबई यांचेकडून रु. २५१,३००/- (रुपये दोन लाख एक्क्यावन्न हजार तिनशे फक्त) रुपयांची १०२५ पुस्तके प्राप्त झाली. या प्राप्त पुस्तकांचे वितरण गरजू विद्यार्थ्यांमध्ये समारंभपूर्वक करण्यात आले.

ब) विद्यार्थ्यांना प्रश्नपेढी पुरविणे -
या विषया बाबतची माहिती देताना विनय बोडस यांनी अशी माहिती सभेस सादर केली की महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी त्यांनी शिकवित असलेल्या विषयांची प्रश्नपेढी तयार करुन ग्रंथालयास E-mail वर soft copy उपलब्ध करुन दिल्या. या बाबतची माहिती विद्यार्थ्यांना देऊन त्यांनी केलेल्या मागणीनुसार मा. ग्रंथपालांनी विद्यार्थ्यांच्या E-mail वर प्रश्नपेढ्या उपलब्ध करुन दिल्या.

क) रोजगार मार्गदर्शन केंद्र, स्पर्धा परीक्षा केंद्र याबाबत -
या बाबत माहिती देताना यासंदर्भात महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांबाबत व कार्यशाळे बाबतची माहिती विनय बोडस यांनी सभेस दिली. रोजगार आणि उद्योजकता या विषयांवर डॉ. यु. पी. कुलकर्णी व श्री मंगेश कुलकर्णी यांची तर स्पर्धा परीक्षांबाबत डॉ. सी. आर. दास आणि श्रीमती मोनिका सिंग उपजिल्हाधिकारी पुणे यांची व्याख्याने तर एक दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेद्वारा श्री वि. वि. आंबेकर श्री गणेश पवार, श्रीमती चित्रा जगताप आणि श्रीमती नेहा पागे यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल माहिती सभेस दिली.

ड) इंग्रजी संभाषण वर्ग -
अपेक्षीत विद्यार्थी संख्या व फी यांचे गणित न जुळल्यामुळे हा उपक्रम या वर्षी महाविद्यालयात सुरु होऊ शकला नाही या बद्दलची माहिती सभेस देण्यात आली.

इ) पुस्तक परिचय -
या विषयाबाबत अशी माहिती देण्यात आली की पुस्तक परिचय हा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राध्यापक प्रबोधिनीद्वारे संपूर्ण वर्षभर आयोजित करण्यात आला. प्राध्यापकांनी वाचलेल्या पुस्तकांची ओळख इतरांना करुन दिली विविध विषयांवरील पुस्तकांचा परिचय देण्यात आला. या कार्यक्रमासंदर्भातील संपूर्ण वृत्तान्त महाविद्यालयाच्या वार्षिकांक 'आम्ही सारस्वत' मध्ये देण्याबाबत मा. श्री विनायक आंबेकर सर यांनी सूचविले व सभेने त्यास एकमताने मान्यता दिली.

त्याचप्रमाणे पुढील शैक्षणिक वर्षामध्ये प्राध्यापकांनी पुरस्कृत,जीत

वाचलेल्या पुस्तकाचा परिचय इंग्रजीतून करून द्यावा असे ठरविले व त्यास सभेने मान्यता दिली.

क) प्राध्यापकांनी प्रचलित खडू-फळा व्याख्यान पद्धती सोबतच राबविलेल्या power point presentation बद्दलची माहिती सभेस देण्यात आली.

२८ जून २०१८ रोजी झालेल्या सभेमध्ये गुणवत्तावाढीसाठी सुचविण्यात आलेल्या अनेक योजनांच्या अंमलबजावणी बाबत सभेमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

४). वर्गातील फळ्यांच्या दुरुस्तीबाबत विचार करणे -

हा विषय चर्चेला आल्यानंतर मा. श्री. विनायक आंबेकर यांनी हा विषय महाविद्यालयाच्या विकास समितीच्या सभेस वर्ग करण्यासंबंधी सूचना केली व सभेने ती मान्य केली.

५) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळेचे विषय.

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी कोणताही विषय सभेपुढे चर्चेसाठी उपस्थित करण्यात आला नाही.

त्यानंतर सभेचे समन्वयक विनय बोडस यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले व सभेचे अध्यक्ष मा. प्राचार्य श्री डॉ. पी. एन. शेंडे सरांच्या अनुमतीने सभा समाप्तीची घोषणा केली.

वाचून सर्वानुमते मंजूर

(Vinay Shripad Bodas)

(डॉ. पी. एन. शेंडे
प्राचार्य

Principal
Saraswati Mandir Night College of Commerce and Arts, Pune-2

Saraswati Mandir Night College of Commerce and Arts, Bajirao Road, Pune-2.

(9)

Saraswati Mandir Night College
of Commerce and Arts
1359, Shukrawar Peth, Pune-2

शुक्रवार, दिनांक २६|०३|२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त-

शुक्रवार, दिनांक २६|०३|२०२१ रोजी सायं ५=०० वाजता online पध्दतीने गुगल मीट वर आयोजित करण्यात आलेल्या महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सुधार समीतीच्या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे -(अध्यक्ष)
श्री. वि. वि. आंबेकर -
डॉ. ए. पी. कुलकर्णी
श्री. आनंद सराफ
डॉ गीता राशिनकर
श्री राजेश अगावणे
श्रीमती आयोध्या जाधव
श्री श्याम कांबळे
श्रीमती स्नेहल शेंडे
डॉ. जया बढे (समन्वयक (सचिव)

या सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज झाले-

१) सभेची विषयपत्रिका वाचणे.
मा. अध्यक्ष प्राचार्य पी. एन. शेंडे यांच्या अनुमतीने सभेस सुरुवात करून समीतीच्या चिटणीस डॉ. जया बढे यांनी सभेची विषयपत्रिका वाचून दाखवली.

२) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे
हा विषयचर्चेला आल्यानंतर डॉ. जया बढे यांनी मंगळवार दिनांक १९ मार्च २०१९ रोजी सायं ६=०० वाजता महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सुधार समितीच्या आयोजित करण्यात आलेल्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्यास सर्व सदस्यांनी एकमताने मंजूरी दिली. त्यावर सभेचे अध्यक्ष डॉ प्राचार्य पी एन शेंडे यांनी नंतर स्वाक्षरी केली.

३) शैक्षणिक वर्ष २०१९-२० AQAR यासंबंधी चर्चा करणे -
हा मुद्दा चर्चेस आल्यावर समिती चिटणीस डॉ. जया बढे यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० AQAR संबंधीची माहिती पुढीलप्रमाणे समितीला दिली criterion प्रमुखांकडून आवश्यक माहिती संकलनाचे काम सुरु आहे. ती माहिती श्री विनय बोडस यांच्याकडे आली की, AQAR भरण्याचे काम सुरु होईल. मे ३१, २०२१ पर्यंत मुदत असून पुढे तीन महिन्याच्या आत AQAR भरता येतो.

४) सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विकासित केलेल्या LMS

बाबतचा आढावा घेऊन चर्चा करणे.
हा मुद्दासभे पुढे आल्यावर समितीच्या चिटणीस डॉ. जया बढी यांनी सभेस पुढीलप्रमाणे माहीती दिली- प्राध्यापक निहाय व विषय निहाय विद्यापीठाकडुन प्राप्त झालेली माहिती सादर केली. यात प्राचार्य डॉ पी एन शेंडे यांनी प्रत्येक विषयाचे म्हणजे प्राध्यापक शिकवत असलेल्या विषयाचे प्रत्येकी ५ video अडीच टक्के भाग तयार करण्याबाबत प्राचार्यांनी उद्दिष्ट प्राध्यापकांना दिलेले होते. ते बऱ्याच प्राध्यापकांकडून साध्य झालेले नाही. त्या चर्चेवर समिती सदस्य श्री आनंद सराफ यांनी प्राध्यापक व प्राचार्य यांच्यात सुसंवादाचा अभाव असल्याचे निदर्शनास नोंदविले. यावर प्राचार्य डॉ पी एन शेंडे यांनी खुलासा करताना लेखी, तोंडी सभेत अनेक वेळा प्राध्यापकांशी याबाबत चर्चा झाल्याचे सांगितले. प्राचार्यांच्या मताशी प्राध्यापक सदस्यांनी सहमती दर्शविले. आणि राहिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत सहमत झाले. आता ही video recording ची सेवा विद्यापीठाने सशुल्क केल्याचे सांगितले त्यामुळे हे शुल्क संबंधीत प्राध्यापकांनी भरायचे की, महाविद्यालयाने भरावे यासंबंधी सभेस विचारणा केली असता मा बि. बि. आंबेकरांनी video recording in-house करावे आणि ३० एप्रिल २०२१ पर्यंत पूर्ण करावे अन्यथा प्राचार्यांनी संबंधीत प्राध्यापकांना नोटीसा पाठवाव्यात असे निर्देश दिले व त्यासंबंधीची जाबाबदारी प्रा. श्याम कांबळे यांच्याकडे सोपवली. या प्रस्तावास सर्व प्राध्यापक सदस्यांनी सहमती दिली.

५) चालू वर्षातील zoom platform वर घेतलेल्या लेक्चरर्सचा आढावा घेणे-
हा मुद्दा सभे पुढे चर्चेला आल्यावर समितीच्या चिटणीस डॉ. जया बढी यांनी पुढील माहिती सभेस दिली- कोव्हिड-१९ या महामारीला सर्वजण तोंड देत असताना जुलै- ऑगस्ट महिन्यापासून zoom platform वर विषयांचे शिकवणे सुरू केले. टप्प्याटप्प्याने तास वाढवत आता रोज अर्ध्या तासाचे चार तास online होत असल्याची माहिती सभेस दिली. हा मुद्दा चर्चा करत असताना प्राध्यापक सदस्यांनी आपापले

Saraswati Mandir Night College
of Commerce and Arts
1359, Shukrawar Peth, Pune-2.

अनुभव सभेस सांगितले. offline पेक्षा online विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याचे प्राध्यापकांनी नमूद केले. यावर सभेतील बाकी सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

६) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने अयत्या वेळचा विषय.

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने अयत्यावेळी कोणताही विषय सभेपुढे चर्चेसाठी उपस्थित करण्यात आला नाही. त्यानंतर सभेचे समन्वयक डॉ. जया बढी यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले व सभेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे यांच्या अनुमतीने सभा समाप्तीची घोषणा केली.

वाचून सर्वानुमते मंजूर

JEBadi
डॉ. जया. ए. बढी
समन्वयक

डॉ. पी. एन. शेंडे
प्राचार्य / अध्यक्ष

Saraswati Mandir Night College of Commerce and Arts, Bajirao Road, Pune-2.

Principal
Saraswati Mandir Night College of Commerce and Arts, Pune-2

शनिवार दिनांक २२।०७।२०२२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक २२।०७।२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजता, महाविद्यालयाची अंतर्गत गुणवत्ता सुधार समितीची सभा गुगल मीट वर घेण्यात आली होती. या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. पी.एन. शेंडे (अध्यक्ष)
श्री. वि. वि. आंबेकर
डॉ. ए. पी. कुलकर्णी
श्री. आनंद सराफ
श्री. राजेश आगवणे
डॉ. गीता राशिनकर
डॉ. आयोध्या जाधव
श्रीमती स्नेहल बोंडे
श्री. प्रशांत मालपुरे
डॉ. जया कद्दी (चिटणीस)

या सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज झाले.

१) सभेची विषयपत्रिका वाचणे.
मा. अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे यांच्या अनुमतीने सभेस सुरुवात करून समितीच्या चिटणीस डॉ. जया कद्दी यांनी सभेची विषयपत्रिका वाचून दाखवली.

२) मागील सभेचे इतिवृत्त वाचणे.
हा विषयचर्चेला आल्यानंतर समितीच्या चिटणीस डॉ. जया कद्दी यांनी शुक्रवार, दिनांक २६।०३। २०२१ रोजी सायं ५=०० वाजता महाविद्यालयाची अंतर्गत गुणवत्ता सुधार समितीची झालेल्या सभेचे इतिवृत्ताचे वाचन केले. त्यास सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली. त्यावर सभेचे अध्यक्ष प्राचार्य पी. एन. शेंडे यांनी इतिवृत्तावर नंतर स्वाक्षरी केली.

३) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये IQAC कडुन झालेल्या कामाचे निवेदन
हा विषयचर्चेला आल्यानंतर समितीच्या चिटणीस डॉ. जया कद्दी यांनी सभेस पुढीलप्रमाणे माहिती दिली. IQAC मधील प्राध्यापक सदस्यांची सभा घेण्यात आली. त्यात बदलेल्या AQAR च्या स्वरूपावर प्राध्यापकांसाठी व्याख्याने आयोजित करावीत, शिवाय विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक विभागाकडुन, समितीकडुन आणि विषयाकडून वर्षभरात ऐका कार्यक्रमाचे आयोजन व्हावे असे सभेत सर्वानुमते ठरले. समितीच्या चिटणीस डॉ. जया कद्दी बदलेल्या AQAR च्या

संदर्भातील offline कार्यशाळेत सहभागी झाल्या. IQAC प्राध्यापक सदस्यांच्या सभेत ठरल्याप्रमाणे बदलेल्या AQAR च्या स्वरूपावरील शासन महिला महाविद्यालय, चेन्नई यांनी online पद्धतीने आयोजित कार्यशाळेत सर्व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. तसेच प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठीच्या फाईल्स तपासणी-स्क्रीनिंगचे काम झाले.

४) शैक्षणिक वर्ष 2020-21 AQAR पूर्ततेसाठी मार्गदर्शन.

हा विषयचर्चेला आल्यानंतर समितीच्या चिटणीस यांनी सभेत शैक्षणिक वर्ष 2020-21 AQAR पूर्ततेसाठी AQAR मधील काही प्रश्न मांडले. प्रश्नाबाबत चर्चा केली त्यावर मा. श्री. आंबेकर सरांनी मांडले की, AQAR मधील प्रश्न दिवसाच्या महाविद्यालयांना समोर ठेवून केलेले आहेत. आपलं नाईट कॉलेज असून काही मर्यादा आहेत. त्यामुळे जे जसे आहे तसेच AQAR मध्ये मांडावे. असे मांडले व यास सभेने मान्यता दिली.

५) दि. २९ ऑक्टोबर 2022 पुनर्मूल्यांकनाबाबत चर्चा करणे.

हा विषयचर्चेला आल्यानंतर समितीच्या चिटणीस यांनी दि. २९ ऑक्टोबर 2022 पुनर्मूल्यांकनाची कालमर्यादा संपत असल्याची व शैक्षणिक वर्ष 2020-21 AQAR ची माहिती संकलनाचे काम चालू असल्याची माहिती सभेस दिली. दि. २९ ऑक्टोबर 2022 पुनर्मूल्यांकन होण्याबाबत शंका समितीच्या चिटणीस यांनी व्यक्त केली असता, समिती सदस्य मा डॉ. ए. पी. कुलकर्णी सरांनी, १ फेब्रुवारी 2022 पर्यंत शैक्षणिक वर्ष 2020-2021 चा AQAR NAAC ऑफीसला पाठवावा. शैक्षणिक वर्ष 2021-22 AQAR साठी माहिती संकलीत करावी व आधीच्या चार ही वर्षांच्या AQAR एकत्र करून SSR तयार करावे असे सभेत मांडले. यापुढे शैक्षणिक वर्ष 2020-21 AQAR १ फेब्रुवारी 2022 पर्यंत गेला पाहिजे हे मा. श्री. आंबेकर सरांनी मांडले. ह्या मताला प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे यांनी आश्वासन दिले.

६) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रम घेण्याबाबत सभेकडून मार्गदर्शन घेणे.

हा विषयचर्चेला आल्यानंतर समितीच्या चिटणीस यांनी कोविड-१९ या महामारीमुळे महाविद्यालयात online तास होत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचे कार्यक्रम कसे राबवावेत असे सभेत मांडले असता, मा. श्री आंबेकर सरांनी मांडले की, सरकारी नियमाचे पालन करून १५ फेब्रुवारी 2022 नंतर

कार्यक्रम घेण्याबाबत विचार करावा. कार्यक्रम घेण्याची घाई करू नये. तसेच प्रत्येक प्राध्यापकाने एक कार्यक्रम द्यावा म्हणजे कार्यक्रमांची संख्यापण वाढेल असे मा. डॉ कुलकर्णी सरांनी मांडले. यास सभेने मान्यता दिली.

७) महाविद्यालयातील online व offline सुविधाबाबत चर्चा.
ही विषयचर्चेला आल्यानंतर मा. श्री. आंबेकर सरांनी कॉलेजचे विकासातील मुद्दे CDC च्या सभेत घ्यावेत असे सुचवले व सभेने ती मान्य केली.

८) NAAC खोली व उपलब्ध सुविधाबाबत-
हा विषयचर्चेला आल्यानंतर मा. श्री. आंबेकर सरांनी मांडले की, जे काही खरेदी करायचे आहे त्याचे पत्र मा. प्राचार्यांना द्यावे ते CDC मध्ये मांडतील. याला सभेने मान्यता दिली.

९) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्या वेळेचे विषय.
यात समिती सदस्य मा. श्री. अगावणे सरांनी IQAC मध्ये सातही criterion प्रमुखांना सदस्य करावे असा विषय मांडला. यावर मा. श्री. आंबेकरसरांनी असे केल्याने काही अडचण आहे का. असे समितीच्या चिटणीस यांना विचारले असता काही अडचण नसल्याचे सांगितले. तेव्हा सभेत IQAC मध्ये बाकीही criterion प्रमुखाना सदस्य करावेसे ठरले व यास सभेने मान्यता दिली.

यापुढे सभेत चर्चेसाठी कोणताही विषय उपस्थित करण्यात आला नाही.

त्यानंतर सभेच्या चिटणीस डॉ. जया बढे यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले व सभेचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. पी. एन शेंडे यांच्या अनुमतीने सभा समाप्तीची घोषणा केली.

JEBadi वाचून सर्वानुमते मंजुर.

18/8/2022

Saraswati Mandir Night College of Commerce and Arts, Bajirao Road, Pune-2.

Officiating Principal
Saraswati Mandir Night College
Commerce and Arts, Pune-2.